सोबत सामान्य प्रशासन विभागाचे "प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित केलेले अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित न राहील्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत" या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक टीआरएन-२०१४/३४२/प्र.क्र.५०/१४/१२-अ, दिनांक २७/५/२०१४ ची प्रत सोबत जोडत आहे.

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१४/२३७
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 3 JAN 2015

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- कार्यासन क्रमांक ४, ४अ व १२ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

क्रमांक/ [illegible] /आस्था/प्रशिक्षण परि/२०१५/७१
दिनांक :- १२/१/२०१५

प्रतिलिपी:
प्राचार्य, शा. अभि. महा. अमरावती / शा. औ. महा., अमरावती / शा. विभागीय महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ
प्राचार्य, शा. तंत्रनिकेतन, अमरावती / यवतमाळ / खामगांव / वाशिम / मुर्तिजापूर माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
सहपत्र :- महाराष्ट्र शासन परिपत्रक

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.

प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित केलेले अधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित न राहील्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः टीआरएन-२०१४/३४२/प्र.क्र.५०/१४/१२-अ,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: २७ मे, २०१४

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांक- टिआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दिनांक २३.९.२०११.

२) शासन निर्णय क्रमांक- टिआरएन-११/प्र.क्र.२८३/११/१२-अ, दिनांक ३० जानेवारी २०१२

प्रस्तावना —

राज्य सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरीता राज्यातील सर्व कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याच्या हेतूने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार सर्व संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना पुढील नमुद केलेल्या टप्प्यांवर प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

अ) पायाभुत प्रशिक्षण ब)पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण क) उजळणी प्रशिक्षण ड) बदलीनंतरचे प्रशिक्षण इ) नवीन विषयाची तोंडओळख प्रशिक्षण

त्याखेरीज यशदामार्फत कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने उपयुक्त विषयांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. त्यासाठी या कार्यासनाकडून मंत्रालयीन विभागातील अधिकारी / कर्मचारी यांची नामनिर्देशने केली जातात. मात्र आजपर्यंतच्या एकूण अनुभवावरून असे आढळून आले आहे की, नामनिर्देशित केलेले अधिकारी / कर्मचारी अशा प्रशिक्षणास जात नाहीत अथवा संबंधित विभागाकडून अशा अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात येत नाही. त्यामुळे प्रशिक्षणाचा कालावधी सुरू होण्याच्या आधी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. त्यानंतरही प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन झालेल्या अधिकाऱ्यांपैकी उपस्थित न राहणाऱ्या अधिकाऱ्यांऐवजी संबंधित विभागाकडून पर्यायी अधिकाऱ्यांची नावे देखील देण्यात येत नाहीत. संबंधित प्रशिक्षणासाठी कमी प्रमाणात अधिकारी/ कर्मचारी उपस्थित राहील्याने प्रशिक्षण आयोजनाचा हेतू साध्य होत नाही.

यापूर्वी संदर्भाधीन अ.क्र. २ येथील शासन निर्णयान्वये प्रशिक्षणासाठी अधिकाऱ्यांची नावे न पाठविणाऱ्या संबंधित विभागप्रमुख / अधिकाऱ्यांविरुध्द तसेच नामनिर्देशनानंतर प्रशिक्षणास उपस्थित न राहणाऱ्या प्रशिक्षणार्थीविरुध्द कारवाई करण्यासाठी राज्य आणि विभागीय स्तरासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून

मा.मुख्य सचिव यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्हा व त्याखालील स्तरासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आले आहे.

मात्र तरीही प्रशिक्षणासाठी जाण्यास काही अधिकारी / कर्मचारी इच्छुक नसल्याचे तसेच काही कार्यालय/ विभागप्रमुख अधिकारी/कर्मचारी यांना कार्यमुक्त करीत नसल्याचे आढळून आले आहे. सबब आता सर्व मंत्रालयीन विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**<u>शासन परिपत्रक —</u>**

१. प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी यांनी प्रशिक्षणासाठी सक्तीने उपस्थित राहणे गरजेचे आहे.प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी यांना संबंधित विभागप्रमुख यांनी कार्यमुक्त करणे सक्तीचे राहील.

२. प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी यांना काही अतिमहत्वाच्या कारणास्तव प्रशिक्षणास उपस्थित राहणे शक्य नसेल तर त्याऐवजी पर्यायी अधिकाऱ्यांची नावे देणे संबंधित विभागांना सक्तीचे राहील.

३. यापुढे दरवर्षी वेतनवाढ देतांना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेमून दिलेले प्रशिक्षण पूर्ण केले किंवा कसे याची पडताळणी करणे आवश्यक राहील.

२. सर्व मंत्रालयीन विभागांनी प्रस्तुत परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५२७१०३६१५८९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sa
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2014.05.27 11:22:39 +05

(डॉ. भगवान सहाय)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

५. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

६. मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

७. मा. प्र.स.(सेवा) यांचे वरीष्ठ स्वीय्य सहायक,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८. *मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

९. महासंचालक, यशदा,राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.

१०.विशेष कार्य अधिकारी, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद

११.विशेष कार्य अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, अमरावती

१२.संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था, वनामती तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, नागपूर

१३.संचालक, प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, (रामेती) तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, कोकण, खोपोली, शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड

१४.संचालक, नाशिक महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, नाशिक

१५.संचालक, प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, (रामेती) तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, पुणे

१६.सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये / प्रशिक्षण संस्था,

१७.मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद महाराष्ट्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

१८. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२

१९.*प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर

२०.*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर

२१.*प्रबंधक, लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालय, मुंबई

२२.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई

२३.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, नागपूर

२४.महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई

२५.महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, नागपूर

२६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२७.निवडनस्ती /सा.प्र.वि.१२-अ.

* पत्राने.